# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र.२८१/२०२२**

**संदर्भ : विद्यापीठ परिपत्रक क्र. ३११/२०२१ (शै. प्रवेश/४१३७ दि. १२/११/२०२१)**

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये व सर्व मान्यताप्राप्त संशोधन संस्था यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क्र. पीजीएस/७७१ दि. २६/०२/२०१६ अन्वये पीएच्.डी. व एम्.फील अभ्यासक्रमासाठीचे शुल्क निश्चित करण्यात आलेले आहे. तथापि, विद्यार्थी संघटना तसेच विविध माध्यमांमधून विद्यार्थ्यांकडून सदर अभ्यासक्रमासाठी जास्तीचे शुल्क आकारण्यात येत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.

सदर बाब विचारात घेता सर्व संबंधितांना वरील संदर्भीय परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते, विद्यापीठाच्या संदर्भीय परिपत्रकान्वये विहित केलेल्या शुल्करचनेनुसारच शुल्क आकारण्यात यावे. त्यापेक्षा अधिकचे शुल्क आकारण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित संस्थेचे संशोधन केंद्र बंद करण्याबाबतची कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, ही विनंती.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/४५७६ )
दिनांक : २३/०९/२०२२ )

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :—**

मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये }
मा. संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था }